**प्रेसनोट**

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात १ ते १९ वर्षे वयोगटातील किमान २४१ दशलक्ष(६८%) बालकांमध्ये आढळणारा आतडयांचा कृमीदोष (पोटातील जंत) हा मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतामुळे होतो. जगात २८ टक्के बालकांना असा कृमीदोष होण्याची शक्यता असते.याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव असणे हे आहे. या कृमीदोषांचा संसर्ग दुषित मातीच्या संपर्कात आल्यामुळे होतो. जंतदोष म्हणजे खानपानव्दारे विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतुमुळे अन्नातील पौष्टीक सत्वे मुलांच्या शरीराला पुरेशी प्रमाणात मिळत नाहीत. यामुळे मुलं सतत आजारी पडतात. बाळाची शारिरिक व बौध्दिक वाढीचा विकास खुंटतो. परिणामी शाळांमधील मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण कमी होऊ लागते. हे जंतू विष्ठेव्दारे बाहेर पडू लागतात. याकरीता परिसरातील स्वच्छतेसोबतच मुलांनी खाण्यापूर्वी हात धुण्याच्यापध्दती अंगीकृत करणे आवश्यक आहे.

शासन आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना शाळा व अंगणवाडी स्तरावर जंतनाशक गोळया देऊन दि.०४/१२/२०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व शिल्लक राहिलेल्या लाभार्थ्यांना दि.१०/१२/२०२४ रोजी गोळया देऊन मॉप अप मोहीम राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश हा १-१९ वर्षे वयोगटातील सर्व शालेय वयोगटातील विद्यार्थी (पटावर असलेली व पटावर नसलेली/ शाळेत न जाणारी सर्व १९ वर्षापर्यंतची मुले व मुली) यांना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देवून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे.

या मोहिमेचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या नियोजनाकामी दि. २७/११/२०२४ रोजी शहर टास्क फोर्स सभा घेण्यात आली. सदर सभेत मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करणेदृष्टीने कार्यक्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याने आरोग्य केंद्रस्तरावर सूक्ष्मकृती आराखडा तयार करणे, मोहिमेची जनजागृती करणे, मुलांना आरोग्य शिक्षण देणे, अंगणवाडी व शाळास्तरावर गोळया वाटप नियोजन करणे, आपत्कालीन कक्ष तयार करणे, लाभार्थ्यांना गोळया घेणेस प्रवृत्त करणेकरीता कार्यक्षेत्रातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग घेणे इ. सूचना देण्यात आल्या.

तरी सदर मोहीम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पालकांनी जास्तीतजास्त सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner